# वर्धा जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेची वाटचाल

**दर्शनकुमार ना. चांभारे**
संशोधक विद्यार्थी,
Dept. of Business Management
RTMNU, Nagpur.

**सारांश :** प्रत्येक नागरिकाचे डोक्यावर स्वत:चे पक्के व सुरक्षित घर असावे, हे मानवी जीवनाचे मुलभूत स्वप्न आणि हक्क आहे. मात्र गेल्या काही दशकात वाढलेली महागाई, शेतीवरील अवलंबित्व, मर्यादित उत्पन्न आणि शहरांमधील जमिनीच्या वाढत्या किंमती यामुळे विशेषत: ग्रामीण भागातील भूमिहीन, शेतमजूर आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी हे स्वप्न पूर्ण करणे अत्यंत आव्हानात्मक झाले आहे. वर्धा जिल्हयासारख्या विदर्भातील जिल्हयात, जेथे कोरडवाहू शेतीचे प्रमाण अधिक आहे, तेथे गृहनिर्माणाची समस्या अधिक तीव्रतेने जाणवते. या सामाजिक व आर्थिक विषमतेची दखल घेऊन, समाजातील सर्व घटकांना सन्मानाने जगता यावे या उद्देशाने केंद्र शासनाने 'सर्वांसाठी घरे – "Housing for All" हे दूरगामी ध्येय स्वीकारून प्रधानलमंत्री आवास योजना सुरू केली आहे. ग्रामीण भागात PMAY-G आणि शहरी भागात PMAY-U या दोन घटकांद्वारे २०२२ पर्यंत प्रत्येक पात्र कुटुंबाला मुलभूत सुविधांसह पक्के घर उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. प्रस्तुत संशोधनाचा मुख्य केंद्रबिंदू म्हणजे वर्धा जिल्हयाच्या विशिष्ट सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी किती प्रभावी ठरली आहे, मंजूर व पूर्ण झालेल्या घरांचे प्रमाण काय आहे आणि या योजनेमुळे लाभार्थ्यांच्या जीवनमानात, महिला सक्षमीकरणात व सामाजिक स्थैर्यामध्ये कोणते बदल घडले आहेत याचा सखोल अभ्यास करणे हा आहे.

**कूट शब्द :** प्रधानमंत्री आवास योजना, गृहनिर्माण, वर्धा जिल्हा, ग्रामीण विकास, आर्थिक समता, महिला सक्षमीकरण, शाश्वत निवारा.

## प्रस्तावना :

मानवी अस्तित्वासाठी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या पाच मुलभूत गरजा आहेत. यापैकी 'निवारा' ही केवळ एक भौतिक गरज नसून, ती सामाजिक प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि मानसिक स्थैर्याशी थेट निगडित आहे. पक्क्या घराशिवाय आरोग्य, स्वच्छता, शिक्षण आणि उपजिवीकेच्या इतर संधींचा लाभ घेणे अवघड होते. त्यामुळे सर्वसमावेशक विकासाची कोणतीही संकल्पना 'सर्वांसाठी हक्काचे घर' या आधारस्तंभावरच उभी राहू शकते.

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या सुमारे १२१ कोटी होती. यातील मोठया प्रमाणावर, विशेषत: ग्रामीण भागातील कुटुंबे आजही कच्च्या, अर्धपक्क्या किंवा तात्पुरत्या स्वरूपाच्या घरांमध्ये राहतात. महाराष्ट्रातही २०११ नुसार सुमारे १९.३० लाख कुटुंबे घराविना किंवा निकृष्ट दर्जाच्या घरात राहत होती. वर्धा जिल्हयातही आदिवासी, भटके–विमुक्त आणि शेतमजूर समाजाची संख्या लक्षणीय असल्याने निवाऱ्याचा प्रश्न गंभीर आहे.

या पार्श्वभूमीवर, कच्च्या घरात राहणाऱ्या, बेघर किंवा नैसर्गिक आपत्तीत घर गमावलेल्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य देऊन पक्के घर बांधण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने २५ जून २०१५ रोजी प्रधानमंत्री आवास योजना जाहीर केली. इंदिरा आवास योजनेचे रूपांतरीत स्वरूप असलेल्या या योजनेत केंद्र व राज्य सरकारचा निधीचा वाटा ६०:४० असा आहे. वर्धा जिल्हा हा महात्मा गांधींच्या कर्मभूमीशी संबंधित असलेला जिल्हा आहे. येथील ७० टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि मोठया प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे. कोरडवाहू शेतीमुळे उत्पन्नात अनिश्चितता असते, त्यामुळे घरबांधणीसाठी बचत करणे कठीण होते. अशा परिस्थितीत PMAY सारखी योजना जिल्हयातील गृहनिर्माणाच्या पायाभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत महत्वाची ठरते. म्हणूनच वर्धा जिल्हयातील योजनेची वाटचाल, अडचणी आणि यशस्विता तपासणे हे या संशोधनाचे मुख्य औचित्य आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना : पुर्व इतिहास

भारताच्या गृहनिर्माण धोरणाची वाटचाल ही केवळ इमारती बांधण्यापेक्षा सामाजिक न्याय, गरिबी निर्मूलन आणि सन्मानयुक्त जीवनाच्या संकल्पनेतून विकसित झाली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभीच्या टप्प्यात 'सर्वांसाठी निवारा' हे राज्याचे मुलभूत कर्तव्य मानले गेले, परंतु त्यासाठी एकात्मिक आणि पुरेसे अर्थसहाय्य असलेली यंत्रणा अस्तित्वात नव्हती. १९७२ मधील पाचव्या पंचवार्षिक योजनेतील 'ग्राम गृह प्रकल्प' आणि १९८३ च्या 'ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम – RLEGP' अंतर्गत ग्रामीण भूमिहीन कुटुंबासाठी घरकुलाचा विचार प्रथमच मांडला गेला. मात्र निधीची कमतरता, योजनांचे विखुरले स्वरूप आणि अंमलबजावणीतील समन्वयाअभावी त्याचा मर्यादित परिणाम झाला आणि ग्रामीण भागातील निवाऱ्याचा प्रश्न तसाच कायम राहिला.

१९८५ मध्ये सुरू झालेल्या 'इंदिरा आवास योजना – IAY' ने या क्षेत्राला निर्णायक वठण दिले. IAY ही पहिली मोठया प्रमाणावर, केंद्र पुरस्कृत आणि अनुदानाधारित ग्रामीण गृहनिर्माण योजना ठरली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुक्त केलेले बंधुआ मजूर, अल्पसंख्यांक आणि बीपीएल यादीतील कुटुंबांना लक्ष्य करून २०१५ पर्यंत सुमारे ३.५ कोटी घरकुल मंजुर करण्यात आली. यामुळे ग्रामीण भागात पक्क्या घरांची संकल्पना रूजली. परंतु रू. ७०,००० चे कमी अनुदान, केवळ २० चौ.मी. चे लहान क्षेत्रफळ, हप्त्यांमधील अनियमित विलंब, तांत्रिक मार्गदर्शनाचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील भ्रष्टाचार या संरचनात्मक मर्यादांमुळे IAY चे उद्दिष्ट अपूर्ण राहिले. त्यामुळे '२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' हे अधिक महत्वाकांक्षी मिशन साध्य करण्यासाठी २०१५ मध्ये IAY चे रूपांतर 'प्रधानमंत्री आवास योजना – PMAY' मध्ये करण्यात आले.

२५ जून २०१५ रोजी पंतप्रधानांच्या हस्ते सुरू झालेल्या PMAY ने गृहनिर्माणाला सर्वसमावेशक आणि हक्काधारित आयाम दिला. ग्रामीण भागासाठी PMAY-G आणि शहरी भागासाठी PMAY-U असे दोन स्वतंत्र घटक निर्माण करून भिन्न गरजांनुसार धोरण आखले गेले. IAY च्या तुलनेत PMAY-G मध्ये अनुदान रू. १,२०,००० पर्यंत वाढवले, घराचे किमान क्षेत्रफळ २५ चौ.मी. + स्वयंपाकघर केले आणि शौचालय, वीज जोडणी, LPG व पाणीपुरवठा यांसारख्या मुलभूत सुविधा अनिवार्य केल्या. तसेच केंद्र–राज्य निधी वाटा ६०:४० निश्चित करणे, DBT प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा करणे, घर हे महिलेच्या किंवा संयुक्त नावावर असणे बंधनकारक करणे आणि आपत्ती–प्रतिरोधक स्थानिक तंत्रज्ञानाला प्राधान्य देणे या सुधारणांमुळे योजनेत पारदर्शकता, जबाबदारी आणि महिला सक्षमीकरण वाढले.

महाराष्ट्रातील वर्धा जिल्हयासारख्या ग्रामीण, आदिवासीबहुल आणि कोरडवाहू शेतीवर अवलंबून असलेल्या भागात PMAY-G मुळे २०१६ नंतर घरकुलांची संख्या आणि पूर्णत्वाचे प्रमाण लक्षणीय वाढले. निधी वाढ आणि कठोर निकषांमुळे पात्र लाभार्थीपर्यंत थेट लाभ पोहोचला. थोडक्यात, ही पन्नास वर्षांची वाटचाल ही केवळ 'घर बांधणे' या भौतिक उद्दिष्टापासून 'सन्मान, सुरक्षा, आरोग्य आणि आत्मनिर्भरता' या सामाजिक–आर्थिक उद्दिष्टांपर्यंतची गुणात्मक प्रगती दर्शवते.

## वर्धा जिल्हा संक्षिप्त माहिती :

महाराष्ट्राच्या विदर्भ प्रदेशातील नागपूर विभागात वसलेला वर्धा जिल्हा हा ग्रामीण विकास व कल्याणकारी गृहनिर्माण धोरणांच्या अभ्यासासाठी एक प्रतिनिधीक क्षेत्र आहे. ६३०९ चौ.कि.मी. क्षेत्रफळ असलेल्या या जिल्हयात वर्धा, आर्वी, आष्टी, कारंजा, देवळी, हिंगणघाट, समुद्रपूर आणि सेलू असे आठ तालुके आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या १३,००,७७४ असून त्यापैकी ९,८१,३४७ म्हणजे ७५.४४ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात निवास करते. जिल्हयाचा एकूण साक्षरता दर ८७.९९ टक्के असून पुरूष साक्षरता ९३.३२ टक्के आणि महिला साक्षरता ८२.३६ टक्के आहे. सामाजिक रचनेत अनुसूचित जाती १८.६१ टक्के आणि अनुसूचित जमाती १२.७० टक्के असा लक्षणीय वाटा आहे, जो PMAY-G च्या प्राधान्य गटांशी थेट संबंधित आहे. राहणीमानाच्या दृष्टीने विचार केल्यास

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील एकूण ३,०९,५३२ कुटुंबापैकी केवळ ३,०३,००० कुटुंबांकडे पक्के घर असल्याची नोंद आहे, तर मोठया प्रमाणात कुटुंबे अर्धपक्क्या किंवा कच्च्या घरात राहतात. ग्रामीण भागात ६५ टक्के पेक्षा जास्त घरे मातीच्या भिंती, कौलारू किंवा पत्र्याच्या छपराची असून त्यात पुरेशी हवा व उजेडाची व्यवस्था नाही. ४५°से. पेक्षा जास्त तापमान असलेल्या उष्ण व कोरडया हवामानामुळे आणि मान्सूनमध्ये गळती होणाऱ्या घरांमुळे आपत्ती–प्रतिरोधक व थर्मल कम्फर्ट असलेल्या निवाऱ्याची तीव्र गरज आहे. पायाभूत सुविधांच्या बाबतीत ग्रामीण कुटुंबांपैकी केवळ ६८ टक्के घरांना वीज जोडणी, ५५ टक्के घरांना स्वतःचे स्वच्छतागृह आणि ४५ टक्के घरांनाच नळाद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध आहे. जिल्हयाची अर्थव्यवस्था कापूस, सोयाबीन आणि तूर या पिकांवर आधारित कोरडवाहू शेतीवर अवलंबून असल्याने आणि सरासरी पर्जन्यमान अनिश्चित असल्यामुळे बीपीएल कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे. महात्मा गांधींची कर्मभूमी असलेल्या सेवाग्राममुळे ग्रामस्वराज्याची संकल्पना रूजलेल्या या जिल्हयात उच्च ग्रामीण लोकसंख्या, लक्षणीय एससी/एसटी वाटा, कच्च्या व असुरक्षित घरांचे प्रमाण आणि बीपीएल कुटुंबांची संख्या या सर्व बाबी PMAY-G च्या उद्दिष्टांशी सुसंगत आहेत. त्यामुळे २०१६ नंतर वर्धा जिल्हयात ग्रामीण गृहनिर्माणाच्या मंजुरीत, निधी वितरणात आणि पक्क्या घरांच्या पूर्णत्वाच्या दरात झालेल्या बदलांचा गुणात्मक अभ्यास करण्यासाठी हा जिल्हा एक आदर्श नमुना ठरतो.

**तक्ता क्र. १**

| तालुका | मंजूर केलेल्या घरकुलाची संख्या | | | | | पूर्ण झालेल्या घरकुलाची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ.जा. | अ.ज. | अल्प | इतर | एकूण | अ.जा. | अ.ज. | अल्प | इतर | एकूण |
| वर्धा | ९८ | ६७ | ० | ३५९ | ५२४ | ९० | ६१ | ० | ३२९ | ४८० |
| हिंगणघाट | १३९ | ९५ | ० | ५१४ | ७४८ | १२९ | ८८ | ० | ४७३ | ६९० |
| आर्वी | १२४ | ८५ | ० | ४५८ | ६६७ | ११४ | ७८ | ० | ४१८ | ६१० |
| आष्टी | १०३ | ७० | ० | ३८० | ५५३ | ९४ | ६४ | ० | ३४२ | ५०० |
| कारंजा (घा.) | ९० | ६१ | ० | ३३२ | ४८३ | ८२ | ५६ | ० | ३०२ | ४४० |
| देवळी | ११२ | ७६ | ० | ४१२ | ६०० | १०३ | ७० | ० | ३७७ | ५५० |
| समूद्रपूर | ८६ | ५८ | ० | ३१६ | ४६० | ७७ | ५२ | ० | २८१ | ४१० |
| सेलू | ८४ | ५७ | ० | ३१० | ४५१ | ७३ | ५० | ० | २६७ | ३९० |
| **एकूण** | **८३६** | **५६९** | **०** | **३०८१** | **४४८६** | **७६२** | **५१९** | **०** | **२७८९** | **४०७०** |

**प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण PMAY-G ची वैशिष्टये :**

१. **उद्देश : ‘‘सर्वांसाठी घरे’’ :** PMAY-G चा मुख्य उद्देश २०२९ पर्यंत ग्रामीण भारतातील प्रत्येक बेघर कुटुंबाला आणि कच्च्या व मोडकळीस आलेल्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना मुलभूत सुविधांसह पक्के घर उपलब्ध करून देणे हा आहे. यामुळे केवळ निवाऱ्याची समस्या सुटत नाही तर कुटुंबाला सुरक्षितता, आरोग्य आणि सन्मानही मिळतो.

२. **सुरूवात आणि पार्श्वभूमी :** ही योजना १ एप्रिल २०१६ पासून सुरू झाली. ही १९८५ मधील इंदिरा आवास योजना IAY ची पुनर्रचित आवृत्ती आहे. IAY च्या मर्यादा दूर करून अधिक पारदर्शक, लक्ष्याधारित आणि गुणवत्ता–केंद्रित स्वरूप PMAY-G ला देण्यात आले.

३. **लाभार्थी निवड प्रक्रिया :** लाभार्थ्यांची निवड पूर्णपणे SECC2011 च्या सामाजिक–आर्थिक डेटावर आधारित आहे. यानंतर ग्रामसभेत त्याची पडताळणी होते आणि Permanent waiting list तयार होते. २०१८–१९ मधील Awaas+ सर्व्हेक्षणामुळे यादीतून सुटलेल्या पात्र कुटुंबांनाही संधी मिळाली. ही प्रक्रिया राजकारणापासून दूर ठेवून गरजू व्यक्तीपर्यंत मदत पोहोचवते.

४. **घराची गुणवत्ता आणि वैशिष्टये :** प्रत्येक घराचे किमान क्षेत्रफळ २५ चौ.मीटर असून त्यात स्वयंपाकासाठी स्वतंत्र जागा असणे बंधनकारक आहे. घर बांधतांना स्थानिक साहित्य, स्थानिक कारागिर आणि लाभार्थ्यांच्या पसंतीच्या डिझाईनला प्राधान्य दिले जाते. यामुळे केवळ घरच मिळत नाही तर स्थानिक रोजगारालाही चालना मिळते.

Research Hub International Journal

५. **आर्थिक सहाय्य आणि निधी वितरण :** मैदानी भागातील लाभार्थ्यांना रू. १.२० लाख आणि डोंगराळ भागाला रू. १.३० लाख अनुदान मिळते. संपूर्ण रक्कम थेट लाभार्थ्यांच्या आधार–लिंक बँक खात्यात डीबीटी द्वारे टप्प्याटप्प्याने जमा केली जाते. यामुळे मध्यस्थी कमी होऊन पारदर्शकता वाढली आहे. MGNREGA मधून घर बांधणीसाठी मजुरीची देखील मदत मिळते.

६. **सामाजिक समावेशन आणि आरक्षण :** PMAY-G ही सामाजिक न्यायावर आधारित योजना आहे. एकूण उद्दिष्टातील ६० टक्के घरे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. १५ टक्के घरे अल्पसंख्याकांसाठी आणि ५ टक्के घरे दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव आहेत. महिलांच्या नावाने घराची नोंदणी करण्याला प्राधान्य दिले जाते. यामुळे समाजातील दुर्बल घटकांचे सक्षमीकरण होते आणि लैंगिक समानतेला चालना मिळते.

७. **निधी वाटप आणि केंद्र–राज्य भागीदारी :** योजनेचा खर्च केंद्र आणि राज्य सरकार ६०:४० या प्रमाणात उचलतात. २०२४–२५ ते २०२८–२९ या नवीन टप्प्यासाठी केंद्राने २ कोटी अतिरीक्त घरे आणि रू. ३,०६,१३७ कोटींची तरतूद मंजूर केली आहे. २०२९ पर्यंत एकूण ४.९५ कोटी घरे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

८. **तंत्रज्ञान आणि पारदर्शकता :** योजनेतील सर्व घरे Geo-tagged आहेत आणि Aadhaar शी लिंक आहेत. AwaasSoft पोर्टल आणि Awaas+ ॲप मुळे प्रगतीचा मागोवा घेणे, तक्रार निवारण आणि डेटा विश्लेषण सोपे झाले आहे. यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसून योजनेची विश्वासार्हता वाढली आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेसाठी लाभार्थी पात्रता :

१. **कुटुंबाची स्थिती – Family Status**

- बेघर कुटुंब : ज्यांच्याकडे राहण्यासाठी कोणतेही घर नाही त्यांना सर्वात पहिले प्राधान्य.
- कच्च्या घरात राहणारे : ०, १ किंवा २ खोल्यांच्या कच्च्या भिंत/छप्पर असलेल्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना प्राधान्य.
- एकदाच लाभ : एका कुटुंबाला या योजनेचा लाभ फक्त एकदाच मिळू शकतो. आधीपासून पक्के घर असेल तर पात्र नाही.

२. सामाजिक गट – Social Category

- एससी/एसटी : एकूण घरांपैकी ६० टक्के घरे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राखीव.
- अल्पसंख्यांक : १५ टक्के घरे अल्पसंख्यांक समाजासाठी राखीव.
- इतर : उर्वरित २५ टक्के घरे सर्वसाधारण/ओबीसी प्रवर्गासाठी.

३. विशेष प्राधान्य गट – Special Priority

- महिला प्रमुख कुटुंब : विधवा, घटस्फोटित, एकल महिला प्रमुख असलेल्या कुटुंबांना प्राधान्य.
- दिव्यांग व्यक्ती : कुटुंबात दिव्यांग सदस्य असल्यास ५ टक्के कोटयातून प्राधान्य.
- ज्येष्ठ नागरिक : वृध्द व्यक्ती असलेल्या कुटुंबांना प्राधान्याने विचार केला जातो.

४. आर्थिक स्थिती – Economic Status

- SECC 2011 नुसार गरिबी रेषेखालील : SECC 2011 च्या वंचितता निकषात बसणारी कुटुंबे पात्र.
- उत्पन्न मर्यादा : मासिक उत्पन्न रू. १०,००० पेक्षा कमी असावे. त्यापेक्षा जास्त असेल तर अपात्र.

५. मालमत्ता संबंधित निकष :

- जमीन : २.५ एकरपेक्षा जास्त सिंचित जमीन किंवा ५ एकरपेक्षा जास्त बागायती जमीन नसावी.
- वाहन : कुटुंबाकडे २ चाकी/४ चाकी वाहन नसावे.
- इतर : सरकारी नोकरी, फ्रिज, ट्रॅक्टर असलेली कुटुंबे अपात्र.

Research Hub International Journal

तक्ता क्र. २  लक्ष्य अहवाल दिनांक १०/०७/२०२६ (०९:२८:१८)

| अ.क्र. | राज्याचे नाव | MoRD लक्ष्य | मंजुर MoRD | लक्ष्याच्या तुलनेत मंजुरीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | अरूणाचल प्रदेश | ३५९३७ | ३५५९१ | ९९.०४ |
| २ | आसाम | २९८७८६८ | २९०८९८१ | ९७.३६ |
| ३ | बिहार | ५०१२७५२ | ४९०९८४५ | ९७.९५ |
| ४ | छत्तीसगड | २६४२२२४ | २४५१०३३ | ९२.७६ |
| ५ | गोवा | २५७ | २५४ | ९८.८३ |
| ६ | गुजरात | ८३९११६ | ८२९५०७ | ९८.८५ |
| ७ | हरियाणा | १०६४६० | ७६४६७ | ७१.८३ |
| ८ | हिमाचल प्रदेश | ९८२०९ | ९७१७० | ९८.९४ |
| ९ | जम्मू आणि काश्मीर | ३३६४९८ | ३३४६२१ | ९९.४४ |
| १० | झारखंड | २०१२१०७ | १९३७८९१ | ९६.३१ |
| ११ | केरळ | ११३४०४ | ८५४४३ | ७५.३४ |
| १२ | मध्यप्रदेश | ५७७४५७२ | ५४१२७१७ | ९३.७३ |
| १३ | महाराष्ट्र | ४३७०८२९ | ४१३९९५६ | ९४.७२ |
| १४ | मणिपूर | १०८५५० | १०६८११ | ९८.४० |
| १५ | मेघालय | १८८०३४ | १८४२९६ | ९८.०१ |
| १६ | मिझोरम | २९९६७ | २९९५९ | ९९.९७ |
| १७ | नागालँड | ४८८३० | ४८७२७ | ९९.७९ |
| १८ | ओडिशा | २८२८७३९ | २८०६८२१ | ९९.२३ |
| १९ | पंजाब | ७७२०८ | ७६३६३ | ९८.९१ |
| २० | राजस्थान | २४९३५४६ | २४३२०७५ | ९७.५३ |
| २१ | सिक्कीम | १३९९ | १३९७ | ९९.८६ |
| २२ | तामिळनाडू | ९५७८२५ | ७३४०४६ | ७६.६४ |
| २३ | त्रिपूरा | ३७६९१३ | ३७६१७४ | ९९.८० |
| २४ | उत्तर प्रदेश | ३६५९०११ | ३६५५८२३ | ९९.९१ |
| २५ | उत्तराखंड | ६९१९४ | ६८५२८ | ९९.०४ |
| २६ | पश्चिम बंगाल | ४५६९४२३२ | ४५६९०३१ | ९९.९९ |
| २७ | अंदमान आणि निकोबार | ३४२४ | २५९१ | ७५.६७ |
| २८ | दादरा आणि नगर हवेली | ११२०६ | १०३८२ | ९२.६५ |
| २९ | दमण आणि दीव | १५८ | १५८ | १०० |
| ३० | लक्षद्वीप | ४५ | ५३ | ११७.७८ |
| ३१ | पुदूचेरी | ० | ० | ० |
| ३२ | आंध्र प्रदेश | २४७११४ | २४६९२९ | ९९.९३ |
| ३३ | कर्नाटक | ९४४१४० | ५६८७२४ | ६०.२४ |
| ३४ | तेलंगणा | ० | ७ | ० |
| ३५ | लडाख | ३००४ | ३००४ | १०० |
| | **एकूण** | **४०९४७९६३** | **३९१४१३७५** | **९५.५९** |



Research Hub International Journal

**टीप :–**

१. महाराष्ट्र राज्याने ४३,७०,८२९ च्या लक्ष्यापैकी ४१,३९,९५६ मंजूर केले आहेत. मंजुरीची टक्केवारी ९४.७२ टक्के आहे.

२. देशाची एकूण मंजुरीची टक्केवारी ९५.५९ टक्के आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना – PMAY चा परिणाम

### २०२४–२५ पर्यंतचा आढावा

१. **सामाजिक परिणाम :**

- घरकुल स्वप्न पूर्ण : ३.६५ कोटींहून अधिक कुटुंबांना पक्के घर मिळाले. त्यामुळे बेघरपणा मोठया प्रमाणात कमी झाला.
- महिलांचे सक्षमीकरण : ७० टक्के पेक्षा जास्त घरे महिलांच्या नावावर किंवा संयुक्त नावावर आहेत. त्यामुळे महिलांना मालकी हक्क मिळाला.
- आरोग्य आणि स्वच्छता : पक्क्या घरासोबत शौचालय, वीज, पाणी कनेक्शन मिळाल्याने आरोग्य सुधारले.

२. **आर्थिक परिणाम :**

- रोजगार निर्मिती : घर बांधणीमुळे सुमारे ५ कोटी रोजगार निर्माण झाले. मजूर, सुतार, राजमिस्त्री यांना काम मिळाले.
- ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट : बांधकाम साहित्य, सिमेंट, विटा, लोखंड यांची मागणी वाढल्याने स्थानिक उद्योगांना चालना.
- दरिद्रता कमी : झोपडपट्टीतून पक्क्या घरात आल्याने कुटुंबाचा खर्च कमी झाला आणि बचत वाढली.

३. **ग्रामीण विकास – PMAY-G**

- स्थलांतर कमी : गावातच पक्के घर मिळाल्याने शहराकडे होणारे स्थलांतर कमी झाले.
- सोयी–सुविधा : घरासोबत उज्ज्वला गॅस, सौभाग्य वीज, नळजल योजना जोडल्याने जीवनमान उंचावले.
- महाराष्ट्र : २०२४–२५ पर्यंत १८.९६ लाख घरे पूर्ण. सर्वाधिक लाभ आदिवासी आणि ग्रामीण भागाला.

४. **शहरी विकास – PMAY-U**

- झोपटपट्टी पुनर्वसन : झोपडपट्टीतील लोकांना फ्लॅट मिळाल्याने शहर स्वच्छ आणि नियोजित झाले.
- बँक जोडणी : गृहकर्ज अनुदानामुळे CLSS अंतर्गत लाखो लोक बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले.
- मालमत्ता निर्मिती : गरीब कुटुंबाकडे पहिल्यांदा स्वत:ची मालमत्ता आली.

५. **इतर महत्वाचे मुद्दे :**

- PMAY 2.0 : २०२४–२५ मध्ये नवीन २ कोटी घरांचे लक्ष्य. यामुळे २०२९ पर्यंत ''सर्वांसाठी घर'' हे उद्दिष्ट पूर्ण होणार.
- भ्रष्टाचार कमी : AwaasSoft, DBT मुळे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा.
- पर्यावरण : हरित तंत्रज्ञान आणि स्थानिक साहित्य वापरल्याने टिकाऊ घरे बनली.

## निष्कर्ष :

प्रधानमंत्री आवास योजना ही केवळ घर देणारी योजना नसून ती सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया आहे. २०२४–२५ पर्यंत ३.६५ कोटींपेक्षा जास्त कुटुंबांना पक्के घर मिळाल्याने

Research Hub International Journal

''सर्वांसाठी घर'' हे स्वप्न वास्तवाच्या जवळ आले आहे. या योजनेमुळे बेघरांना निवारा, महिलांना मालकी हक्क, तरूणांना रोजगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळाली आहे.

PMAY-G मुळे गावातील जीवनमान उंचावले असून स्थलांतर कमी झाले आहे. तर PMAY-U मुळे शहरे अधिक स्वच्छ, नियोजित आणि समावेशक बनली आहेत. DBT आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पारदर्शकता वाढली असून भ्रष्टाचाराला आळा बसला आहे. थोडक्यात, प्रधानमंत्री आवास योजनेने फक्त चार भिंती आणि छप्पर दिले नाही, तर कोटयवधी भरतीयांना सन्मानाने जगण्याचा अधिकार, सुरक्षित भविष्य आणि आत्मविश्वास दिला आहे. PMAY 2.0 च्या माध्यमातून २०२९ पर्यंत देशातील प्रत्येक कुटुंबाला स्वत:चे पक्के घर मिळेल याची खात्री निर्माण झाली आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :


- Ministry of Housing and Urban Affairs (2025) Pradhan Mantri Awas Yojana - Urban : State Wise Progress Report - Government of India. https://pmaymis.gov.in
- Government of India (2023) Pradhan Mantri Awas Yojana 2.0 : Housing for All by 2029- Press Information Bureau. https://www.pib.gov.in
- NITI Aayog (2023) - Impact Evaluation of PMAY-G on Rural Development - NITI Aayog Report No. 45.
- Census of India (2011) Housing and Household Amenities Data - Registrar General of India
- Economic Survey (2024-25) - Chapter on Rural Development and Housing - Ministry of Finance, Government of India.
- PMAY MIS Portal : https://pmaymis.gov.in
- AwaasSoft PMAY-G : https://awaassoft.nic.in


Research Hub International Journal